शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून राज्यात सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेस अनुसरुन पीआयओ/ एनआरआय च्या नवीन जागांना व पूर्वीच्या जागांच्या मुदतवाढीस शासनाची मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र. २७९/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०३ सप्टेंबर, २०१६.

वाचा :- १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय क्र. टीईएम-२०१५/प्र.क्र.२७२/तांशि-४, दि.२९.०५.२०१५
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी /मान्यता/२०१६/८६१, दि. ०१.०७.२०१६.

प्रस्तावना :

उपरोक्त वाचा २) येथील पत्रान्वये संचालक, तंत्र शिक्षण यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून दिनांक २३.०५.२०१६ च्या ई_मेल द्वारे राज्यात सुरू असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता प्राप्त मान्यतेच्या यादीनुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून ९ संस्थातील एकूण २२ अभ्यासक्रमांसाठी पीआयओ (Foreign Nationals / Persons of Indian Origin) / एनआरआय (Non-Resident Indians) च्या नवीन जागांना मान्यता व पूर्वीच्या जागांच्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या धोरणानुसार व त्यांनी दिलेली मान्यता विचारात घेऊन, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये सोबतच्या Annexure A मध्ये नमूद केलेल्या ६ संस्थांमधील १४ अभ्यासक्रमांसाठीच्या पीआयओ / एनआरआयच्या पूर्वीच्या जागांच्या मुदतवाढीस सन २०१५-१६ मध्ये वाचा १) येथील शासन निर्णयान्वये दिलेली मान्यता लक्षात घेता कार्योत्तर मान्यता देण्याची तसेच Annexure B नमूद केलेल्या ३ संस्थांमधील ८ अभ्यासक्रमांसाठीच्या पीआयओ / एनआरआयच्या नवीन जागांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये सोबतच्या Annexure A मध्ये नमूद केलेल्या ६ संस्थांमधील १४ अभ्यासक्रमांसाठीच्या पीआयओ / एनआरआयच्या पूर्वीच्या जागांच्या मुदतवाढीस शासनाची कार्योत्तर मान्यता तसेच Annexure B मध्ये नमूद केलेल्या ३ संस्थांमधील ८ अभ्यासक्रमासाठीच्या पीआयओ / एनआरआयच्या नवीन जागांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेक्षक्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४. संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५. सदर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६. शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत .तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे .तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९. रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

१०. याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१६०९०३१२३०४५९९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Madan Maruti Morve
Date: 2016.09.12 17:20:57 +05'30'

(म.मा.मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१.संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२.सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,मुंबई /पुणे/नाशिक (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३.संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४.संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५.अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
६.सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
७.विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
८.निवड नस्ती/तांशि-४.

Government Resolution, Higher and Technical Education, No. TEM-2016/C.R. 2 79/TE-4, Dated 03.09.2016

EoA for NRI-PIO Seats approved by AICTE for A.Y.2016-17

Annexure A

Sr. NO.	Dte Code	PERMANENT ID	NAME OF THE INSTITUTE	INSITUTE ADDRESS	INTITUTE TYPE	PROGRAMME	LEVEL OF COURSE	SHIFT	COURSE	FULL TIME / PART TIME	APPROVED INTAKE 2015-16	APPROVED INTAKE 2016-17	NRI APPROVED STATUS	PIO APPROVED STATUS
1	3103	1-2735826	K.J. SOMAIYA INSTITTUTE OF MANAGEMENT STUDIES & RESERACH	VIDYANAGAR, VIDYAVIHAR(E) MUMBAI	Unaided - Private	MANAGEMENT	POST GRADUATE DIPLOMA	1st Shift	POST GRADUATE DIPLOMA IN MANAGEMENT	FULL TIME	120	120	Yes	Yes
2	5179	1-7718584	VISHWABHARATI ACADEMY'S COLLEGE OF ENGINEERING, AHMEDNAGAR	GAT NO. 171, 145/1, 2 VILLAGE SAROLA BADDI, JAMKHED ROAD, TQ. AHMEDNAGAR DIST. AHMEDNAGAR	Unaided - Private	ENGINEERING AND TECHNOLOGY	UNDER GRADUATE	1st Shift	COMPUTER ENGINEERING	FULL TIME	60	54	NA	Yes
									ELECTRONICS & TELECOMMUNICATION ENGINEERING (TECHNOLOGYNICIAN ELECTRONIC RADIO)	FULL TIME	60	54	NA	Yes
									MECHANICAL ENGINEERING	FULL TIME	120	54	NA	Yes
									CIVIL ENGINEERING	FULL TIME	60	54	NA	Yes
									MECHANICAL ENGINEERING (SANDWICH)	FULL TIME	60	54	NA	Yes
3	6007	1-4197831	WALCHAND COLLEGE OF ENGINEERING	OPP. WILLINGDON COLLEGE POST OFFICE VISHRAMBAG	Govt aided	ENGINEERING AND TECHNOLOGY	UNDER GRADUATE	1st Shift	MECHANICAL ENGINEERING	FULL TIME	120	60	Yes	Yes
									ELECTRONICS ENGINEERING	FULL TIME	120	60	Yes	Yes
4	6358	1-5760474	SINHGAD TECHNICAL EDUCATION SOCIETY'S SINHGAD COLLEGE OF PHARMACY	S. NO.44/1, OFF SINHGAD ROAD, VADGAON (BK.),	Unaided - Private	PHARMACY	UNDER GRADUATE	1st Shift	PHARMACY	FULL TIME	120	100	NA	Yes
5	6375	1-5303346	PADMASHREE DR D Y PATIL INSTITUTE OF PHARMACEUTICAL SCIENCES AND RESEARCH	SANT TUKARAM NAGAR, OPP HINDUSTAN ANTIBIOTICS, PIMPRI, PUNE.411018	Unaided - Private	PHARMACY	UNDER GRADUATE	1st Shift	PHARMACY	FULL TIME	120	100	NA	Yes
6	6547	1-8811131	SURYADATTA INSTITUTE OF MANAGEMENT AND MASS COMMUNICATION	SARASWATI, SURVEY NO. 342, OFF PASHAN CHANDANI CHOWK ROAD, BESIDES DSK RANWARA, NEAR LALANI QUANTUM, BAVDHAN (BK), PUNE-411021	Unaided - Private	MANAGEMENT	POST GRADUATE DIPLOMA	1st Shift	FINANCE+MARKETING	FULL TIME	60	60	NA	Yes
									HUMAN RESOURCE+ INTERNATIONAL BUSINESS	FULL TIME	60	60	NA	Yes
									MARKETING+INTERNATIONAL BUSINESS	FULL TIME	60	60	NA	Yes
									MARKETING+INFORMATION TECHNOLOGY	FULL TIME	60	60	NA	Yes

Government Resolution, Higher and Technical Education, No. TEM-2016/C.R. 279/TE-4, Dated 03.09.2016
EoA for NRI-PIO Seats approved by AICTE for A.Y.2016-17
Annexure B

Sr. NO.	Dte Code	PERMANENT ID	NAME OF THE INSTITUTE	INSITUTE ADDRESS	INTITUTE TYPE	PROGRAMME	LEVEL OF COURSE	SHIFT	COURSE	FULL TIME / PART TIME	APPROVED INTAKE 2015-16	APPROVED INTAKE 2016-17	NRI APPROVED STATUS	PIO APPROVED STATUS
1	3207	1-5772986	PILLAI COLLEGE OF ENGINEERING	DR. K. M. VASUDEVAN PILLAIS, SECTOR 16, NEW PANVEL, NAVI MUMBAI -410206	Unaided - Private	ENGINEERING AND TECHNOLOGY	UNDER GRADUATE	1st Shift	COMPUTER ENGINEERING	FULL TIME	NULL	120	Yes	Yes
									INFORMATION TECHNOLOGY	FULL TIME	NULL	120	Yes	Yes
									ELECTRONICS ENGINEERING	FULL TIME	NULL	120	Yes	Yes
2	6370	1-2942084	P. E. SOCIETY'S MODERN COLLEGE OF PHARMACY, NIGDI, PUNE-44	SECTOR-21, YAMUNANAGAR, NIGDI, PUNE-411044 MAHARASHTRA INDIA	Unaided - Private	PHARMACY	POST GRADUATE	1st Shift	PHARMACEUTICAL CHEMISTRY	FULL TIME	10	6	NA	Yes
									PHARMACOLOGY	FULL TIME	18	12	NA	Yes
									QUALITY ASSURANCE TECHNIQUES	FULL TIME	24	21	NA	Yes
3	6641	1-2782821	PUNE INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT	605/1 MUKAYWADI ROAD, PIRANGUT, TAL MULSHI	Unaided - Private	MANAGEMENT	POST GRADUATE DIPLOMA	1st Shift	POST GRADUATE DIPLOMA IN MANAGEMENT	FULL TIME	240	240	NA	Yes
									POST GRADUATE DIPLOMA IN MANAGEMENT	FULL TIME	120	120	NA	Yes